Vol 2 Issue 11 May 2013

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary
Research Journal

# GoldenResearch Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 11, May. 2013
**ISSN:-2231-5063**

Available online at www.aygrt.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *राज्याच्या कोकण व मराठवाडा महसूल विभागात स्वयंसेवी युवक मंडळांना शासनाने केलेली वित्तीय तरतूद व झालेला व्यय*

*प्रविण लामखाडे*

राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालय, कुही

***सारांश:***

18 ते 35 वयोगटातील युवक हा भारतातील लोकसंख्येतील एक मोठा असा घटक असून त्यामध्ये अनेक प्रकारच्या सुप्त शक्ती दडल्या आहेत. युवकांमधील ही सुप्त शक्ती देशाची दशा व दिशा निश्चितच विधायक दिशेने विकसीत करण्यास समर्थ आहे. त्यांचे सामाजिक व राष्ट्र जीवनाला योगदान मिळावे यासाठी त्यांना संघटीत करणे आवश्यक आहे. " Unity is strength " संघशक्ती बळ असते व या बळाच्या जोरावरच अपेक्षीत कार्य पूर्ण होउ शकते.

### *प्रस्तावना :–*

राष्ट्र उभारणीच्या कार्यक्रमासाठी युवा संघ शक्ती वापरण्याच्या दृष्टिकोन समोर ठेवून युवकांच्या गरजांना प्राधान्य देण्याकरीता महाराष्ट्र शासनाने जुलै 1970 मध्ये क्रीडा व युवक सेवेसाठी स्वतंत्र संचालनालय स्थापन केले. शारीरिक शिक्षण क्रिडा युवक सेवा विषयक विकासासाठी या संचालनालयांतर्गत अनेक उपक्रम राबविण्यात येवू लागले. शासनाने " महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण 2001"

अंतर्गत युवक कल्याण कार्यक्रम राबविण्यास सुरूवात केली. युवक कल्याण कार्यक्रमाद्वारे युवकांचा शारीरिक विकास, सुदृढता व शरीराच्या हालचाली मध्ये नैपुण्यता व व्यक्तिमत्वाचा विकास साधण्यास मदत व्हावी हा हेतू ठेवून युवक कल्याण कार्यक्रमाचे सुसुत्रबध्द आयोजन व नियोजन स्वयंसेवी युवक मंडळाद्वारे राबविण्यास शासनाने सुरूवात केली.

युवक कल्याण कार्यक्रमांतर्गत अनेक उपक्रम शासनाद्वारे राबविण्यांत येत आहेत. हे उपक्रम राबविण्याकरिता शासनाद्वारे आर्थिक सहाय्य केले जाते. शासनाने युवक कल्याण कार्यक्रमांतर्गत 2002–2008 या कालावधीत राज्यातील कोकण व मराठवाडा या महसूल विभागातील युवकांच्या सर्वसाधारण, अनुसूचीत जाती व आदिवासी वर्गातील स्वयंसेवी युवक मंडळांना युवक कल्याण योजनेकरिता केलेली तरतूद व झालेला व्यय याचा तुलनात्मक अभ्यास करून या योजनांचा लाभ युवकांना व समाजाला कितपत झाला व न झाल्यास त्याकरीता आवश्यक उपाययोजना व सुधारणा सुचविणे हा आहे.

### *अध्ययनाची उपयोगिता :–*

राज्यातील कोकण व मराठवाडा महसूल विभागात स्वयंसेवा युवक मंडळांना शासनाने केलेली वित्तिय तरतूद व झालेला व्यय–तुलनात्मक अभ्यास.

1.महाराष्ट्र शासन राबवीत असलेल्या युवक कल्याण योजनांचा अभ्यास करणे.
2.शासनाने राबविलेली युवक कल्याण योजना कितपत यशस्वी झाली व कितपत झालेली नाही याची कारणे कायम याचा शोध घेणे व उपाययोजना सूचविणे.
3.युवा शक्तीचा स्वतः व समाजाकरिता उपयोग योग्य दिशेने व्हावा या करीता उपाययोजना सुचविणे.

### *संशोधनाच्या मर्यादा :–*

महाराष्ट्र राज्यातील महसूल विभाग कोकण 6 व मराठवाडा विभाग 8 एकूण – 14 जिल्हयाचा समावेश संशोधनाकरिता केला आहे.

### *तत्थाचे संकलन :–*

संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा वापर करून जिल्हयातील युवक मंडळाचे पदाधिकारी, क्रीडातज्ञ, क्रीडा संघटनांमधील पदाधिकारी, सदस्य शासनाचे विभागीय व जिल्हा क्रीडा अधिकारी मुलाखत व प्रश्नावली साधनांचा वापर करून संशोधनाकरिता माहिती एकत्रीत करून खालील प्रमाणे विश्लेषण करण्यांत आले.

### *विश्लेषण :–*

राज्यातील कोकण व मराठवाडा महसूल विभागातील ग्रामिण व नागरी भागातील स्वयंसेवी युवक मंडळांना क्रीडा धोरणानुसार

**Title :** *'राज्याच्या कोकण व मराठवाडा महसूल विभागात स्वयंसेवी युवक मंडळांना शासनाने केलेली वित्तीय तरतूद व झालेला व्यय*
**Source:Golden Research Thoughts [2231-5063]** *प्रविण लामखाडे* **yr:2013 vol:2 iss:11**

आर्थिक सहाय्य योजनेच्या अंतर्गत सर्वसाधारण व अनुसूचित जाती, आदिवासी वर्गाकरिता केलेली आर्थिक तरतूद झालेली व्यय.

*तालिका – 1*
*सर्वसाधारण वर्गासाठी केलेली आर्थिक तरतूद व व्यय विवरण.*

| | कोकण | मराठवाडा |
|---|---|---|
| तरतूद | 38.71 | 55.03 |
| प्रत्यक्ष खर्च | 38.71 | 53.82 |
| तरतूद केलेल्या निधीचा वापर % | 100% | 97.80 |

*आलेख क.–1*
*ग्रामीण /नागरी भागातील स्वयंसेवी युवक मंडळांना आर्थिक तरतूद व व्यय, सर्वसाधारण*

कोकण विभाग मराठवाडा विभाग
तरतूद केलेल्या निधीचा वापर

वर्ष 2002–2003 पर्यंत कोकण विभागासाठी 38.71 लक्ष रू. तसेच मराठवाडा विभागासाठी 55.03 लाख रू. इतकी तरतूद करण्यांत आली होती. त्यानुसार कोकण व मराठवाडा विभागात अनुकमें 38.71 रू. व 53.82 लक्ष रू. एवढा प्रत्यक्ष खर्च झाल्याचे निदर्शनास येते. उपरोक्त माहितीच्या आधारे असे स्पष्ट होते की, कोकण विभागाकरीता एकूण तरतूद केलेल्या निधीपैकी 100 टक्के निधीचा वापर करण्यांत आला व मराठवाडा विभागात एकूण तरतूद केलेल्या निधीपैकी 97.80 टक्के निधीचा वापर करण्यांत आला असे दिसून येते.

वरिल आलेख व तालिकेवरून स्पष्ट होते की, कोकण तसेच मराठवाडा विभागात महाराष्ट्र शासनाची सर्वसाधारण वर्गासाठी ग्रामिण व नागरी भागातील स्वयंसेवी युवक मंडळांना आर्थिक सहाय्य योजनेच्या तरतूद अथवा प्रत्यक्ष खर्च हयामध्ये महत्वपूर्ण फरक आढळत नाही.

*तालिका –2*

शासनाच्या कीडाधोरणानुसार ग्रामिण व नागरी भागातील स्वयंसेवी युवक मंडळांना आर्थिक सहाय्य योजनेच्या अंतर्गत कोकाण व मराठवाडा विभागातील अनुसूचित जाती वर्गासाठी केलेली आर्थिक तरतूद व झालेला व्यय.

| | कोकण | मराठवाडा |
|---|---|---|
| तरतुद | 19.43 | 271 |
| प्रत्यक्ष खर्च | 19.43 | 271 |
| तरतूद केलेल्या निधीचा वापर % | 100% | 100% |

*आलेख क.–2*
*ग्रामीण /नागरी भागातील स्वयंसेवी युवक मंडळांना आर्थिक तरतूद व व्यय, अनुसुचित जाती वर्ग*

वर्ष 2002–2008 पर्यंत कोकण विभागासाठी 19.43 लक्ष रू. तसेच मराठवाडा विभागासाठी 271 लक्ष रू. इतकी तरतूद करण्यांत आली होती. त्याप्रमाणे दोन्ही विभागात संपूर्ण तरतूद केलेल्या आर्थिक सहाय्याचा व्यय झालेला उपरोक्त तालिकेवरून दिसून येतो.

वरील आलेख कमांक 2 वरून स्पष्ट होते की, कीडाधोरणानुसार ग्रामिण व नागरी भागातील स्वयंसेवी युवक मंडळांना आर्थिक सहाय्य या योजनेच्या अंतर्गत कोकण विभागासाठी 2002–2008 पर्यंत 19.43 लक्ष रू. ची तरतूद करण्यांत आली होती व मराठवाडा विभागासाठी 271 लक्ष रू. ची तरतूद करण्यांत आली होती महाराष्ट्र शासनाच्या कीडा विभागातून उपलब्ध झालेल्या दस्तऐवजावरून स्पष्ट होते की, दोन्ही विभागात तरतूद अथवा प्रत्यक्ष खर्च यामध्ये महत्वपूर्ण फरक आढळतो. मराठवाडा विभागात कोकण विभागाच्या तुलनेत तरतूद अथवा व्यय लक्षणीयरितया अधिक आहे.

*तालिका –3*

शासनाच्या कीडाधोरणानुसार ग्रामिण व नागरी भागातील स्वयंसेवी युवक मंडळांना आर्थिक सहाय्य योजनेच्या अंतर्गत कोकण व मराठवाडा विभागातील आदिवासी वर्गासाठी केलेली आर्थिक तरतूद व झालेला व्यय.

| | कोकण | मराठवाडा |
|---|---|---|
| तरतूद | 15.20 | 14.80 |
| प्रत्यक्ष खर्च | 15.20 | 14.80 |
| तरतूद केलेल्या निधीचा वापर % | 100% | 100% |

आलेख क्र.–3

ग्रामीण /नागरी भागातील स्वयंसेवी युवक मंडळांना आर्थिक सहाय्य आदिवासी वर्ग

कोकण विभाग मराठवाडा विभाग
तरतूद केलेल्या निधीचा वापर

वर्ष 2002–2008 पर्यंत कोकण विभागासाठी 15.20 लक्ष रू. ची तरतूद करण्यांत आली व तरतूदी प्रमाणे संपूर्ण व्यय दिसून येतो. मराठवाडा विभागासाठी 14.80 लक्ष रू. तरतूद करण्यांत आली व तरतूदी प्रमाणे संपूर्ण व्यय दिसून येतो. दोन्ही विभागात संपूर्ण तरतूद केलेल्या आर्थिक सहाय्याचा व्यय झालेला उपरोक्त तालीकेवरून दिसून येतो.

वरील आलेख क्रमांक तीन वरून स्पष्ट होते की क्रीडाधोरणानुसार ग्रामिण व नागरी भागातील स्वयंसेवी युवक मंडळांना आर्थिक सहाय्य या योजनेच्या अंतर्गत कोकण विभागासाठी 2002–2008 पर्यंत 15.20 लक्ष रू. ची तरतूद करण्यांत आली होती व मराठवाडा विभागासाठी 14.80 लक्ष रू. ची तरतूद करण्यांत आली होती. महाराष्ट्र शासन क्रीडा विभागातून उपलब्ध झालेल्या दस्तेऐवजावरून स्पष्ट होते की, दोन्ही विभागात तरतूद अथवा प्रत्यक्ष खर्च हयामध्ये महत्वपूर्ण फरक आढळत नाही.

***निष्कर्ष :–***

शासनाच्या क्रीडा धोरणात समाविष्ट करण्यांत आलेल्या ग्रामिण व नागरी भागातील स्वयंसेवी युवक मंडळांना आर्थिक सहाय्य योजनाबाबत उपलब्ध झालेली माहिती (2002.2008) पर्यंत व त्या माहितीच्या विश्लेषणावरून कोकण व मराठवाडा विभागातील उपरोक्त योजनेतील अंमलबजावणी संदर्भत, सर्वसाधारण, अनुसूचित जाती व आदिवासी वर्ग या तीन स्तरातील स्वयंसेवी युवक मंडळांना शासनाने केलेली आर्थिक तरतूद व झालेला व्यय याच्या तुलनात्मक अभ्यासावरून खालील प्रमाणे निष्कर्ष आहेत.

1.कोकण व मराठवाडा विभागातील ग्रामिण व नागरी भागातील स्वयंसेवी युवक मंडळांना (सर्व साधारण वर्ग) शासनाच्या आर्थिक सहाय्य योजनेच्या तरतूद व प्रत्यक्ष खर्च हयामध्ये महत्वपूर्ण फरक आढळत नाही.
2.अनुसूचित जाती वर्गातील स्वयंसेवी युवक मंडळांना शासनाने केलेल्या आर्थिक सहाय्य योजनेच्या तरतूद अथवा प्रत्यक्ष खर्च हयामध्ये महत्वपूर्ण फरक आढळतो. जसे मराठवाडा विभागात कोकण विभागाच्या तुलनेत तरतूद अथवा खर्च लक्षणीयरित्या अधिक आहे.
3.कोकण तसेच मराठवाडा विभागात आदिवासी वर्ग स्वयंसेवी युवक मंडळांना शासनाने केलेल्या आर्थिक सहाय्य योजनेच्या तरतूद अथवा प्रत्यक्ष खर्च हयामध्ये महत्वपूर्ण फरक आढळत नाही.
4.शासनाचा युवक केंद्रे स्थापन करण्यामागे असलेल्या उद्दिश्टांची निधी अभावी पूर्तता झालेली दिसून येत नाही.
5.स्वयंसेवी युवक मंडळांमध्ये शासनाच्या युवक कल्याण योजना राबविण्याची क्षमता दिसून येते. त्यांच्याकडे मनुष्यबळ आहे पण आर्थिक बळ नाही असे दिसून येते.
6.आर्थिक सहाय्य प्राप्त करून घेण्याकरिता अंमलात असलेली शासनाची पध्दत सोयीची नाही असे दिसून येते.
7.ग्रामिण व आदिवासी भागात युवक कल्याण योजनांचा प्रचार व प्रसार योग्य प्रमाणात झाला नाही असे दिसून येते.
8.स्वयंसेवी युवक मंडळांना युवक कल्याण योजना राबविण्याकरीता स्थानिक स्वराज्य संस्थ, औद्योगिक व वाणिज्यिक प्रतिशठान यांचे कडून सक्रीय सहकार्य मिळत नाही असे दिसून येते.
9.महाराष्ट्र राज्य युवक कल्याण मंडळावर अशासकीय सदस्य म्हणून ग्रामिण व आदिवासी भागातील स्वयंसेवी मंडळातील पदाधिका–यांचे प्रमाण अतिअल्पच आहे.
10.समन्याय तत्वाने राज्यातील प्रत्येक विभागाकरीता आर्थिक तरतूद झाल्याचे दिसून येत नाही.
11.नागरी भागात स्वयंसेवी युवक कल्याण मंडळाद्वारे युवक कल्याण योजना चांगल्या प्रकारे राबविण्यांत आल्याचे आढळून आले.

***उपाययोजना :–***

1.स्वयंसेवी युवक कल्याण मंडळांना शासनाने अनुदान देण्याची पध्दत सरल व पारदर्शक असावी.
2.ग्रामिण व आदिवासी भागातील स्वयंसेवी युवक कल्याण मंडळांना विशेश निधी देवून त्यांना प्रोत्साहित करावे.
3.युवक कल्याण योजना चांगल्या प्रकारे राबविणारा स्वयंसेवी युवक कल्याण मंडळांना रोख बक्षीस देवून त्यांच्या पदाध्कि–यांचा जाहिर सत्कार करावा.
4.स्वयंसेवी युवक कल्याण मंडळांच्या सचिव व अध्यक्षपदावर खेळाडू किंवा जाणकारचीच नेमणूक असावी.
5.स्वयंसेवा युवक कल्याण मंडळात राजकीय व्यक्तीचा हस्तक्षेप नसावा.
6.युवकांत श्रमप्रतिष्ठा निर्माण करण्याकरिता शासकीय योजनेत शिबीराचे आयोजन करावे व स्वयंसेवी युवक मंडळाच्या सभासदांकडून श्रम करून घ्यावे त्यामुळे त्यांच्यात शिस्त निर्माण होईल. श्रम प्रतिष्ठा वाढीला लागेल व त्यांना श्रमाचा मोबदला मिळेल.
7.स्वयंसेवी युवक मंडळ व स्थानिक स्वराज्य संस्था, औद्योगीक व वाणिज्यिक प्रतिष्ठाने, स्थानिक सामाजिक व सांस्कृतिक मंडळाच्या समन्वयातून विविध उपक्रम राबविण्याच्या हेतूने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

8.स्वयंसेवी युवक मंडळावर व त्यांच्या उपक्रमांवर देखरेख ठेवणारी प्रभावी यंत्रणा असावी.
9.स्वयंसेवी युवक मंडळाच्या उपक्रमाला प्रसिध्दी माध्यमाद्वारे प्रसिध्दी मिळाल्यास ग्रामिण व आदिवासी भागात युवक केंद्राचा प्रसार होण्यास गती येईल.
10.स्वयंसेवी युवक मंडळात युवतींचा सहभाग वाढविण्याकरिता त्यांना प्रोत्साहित करून समानतेची वागणूक देणे व आवश्यक सोई उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.
11.नागरी ग्रामिण व आदिवासी भागातील सामाजिक, सांस्कृतिक व युवकांच्या गरजा लक्षात घेवून त्याची पुर्तता करण्याकरिता शासनाने वेगवेगळे उपक्रम व योजना तयार कराव्यात व त्याकरिता वेगळी आर्थिक तरतूद करावी.

*संदर्भ* :–

1.सन 2002–2007 महाराष्ट्र राज्यातील कार्यक्रम अंदाजपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासकीय मुद्रणालय, पुणे.
2.कोकण व मराठवाडा विभागातील उपसंचालक, क्रीडा अधिकारी यांच्या जिल्हयातील योजना त्या करिता कमी / अधिक खर्च व अंमलबजावणी.
3.शालेय शिक्षण व क्रीडा व युवक सेवा संचालनालय कार्यक्रम अंदाजपत्रक 2002–2008.
4.महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण 2001.
5.क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, विविध योजना मार्गदर्शिका.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net